## नियमित दिवाणी दावा क्र.२९/२०१५ मधील निशाणी क.५ खालील आदेश

वादीने प्रस्तुत दावा हा जमीनीच्या हद्‌दी खुणा ठरवुन मिळणेसाठी व निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला असून, प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादीने वादीच्या मिळकतीमध्ये नविन हक्क वहिवाट प्रस्थापित करु नये तसेच वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळे करु नये म्हणून प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेची विनंती केली आहे.

०२. वादीच्या अर्जाची थोडक्यात हकिगत अशी की,

मौजे वांबोरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर येथील गट क्र.७३४/४ पैकी २.५० आर (यापुढे वरील मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधीत करण्यात आलेले आहे) ही मुळची प्रतिवादीच्या मालकीची होती. प्रतिवादीने सदर मिळकत वादीस दि.०९/०६/२००६ रोजी नोंदणीकृत खरेदीखताआधारे विक्री केलेली असून तेंव्हापासून दावा मिळकत वादीच्या ताब्यात आहे.

०३. दावा मिळकतीच्या पश्चिमेकडून व उत्तरेकडून प्रतिवादीची गट क्र.७३४/४ ची उर्वरित जमिन आहे. त्यामुळे प्रतिवादी हा वादीच्या दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादी हा बाहेरगावी राहणारा इसम असून अनपेक्षितरित्या त्याची नोकरी गेलेली आहे. त्यामुळे वादीस दावा मिळकतीशिवाय उत्पन्नाचे साधन नाही. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये पश्चिम व उत्तर बाजूने अतिक्रमण केलेले आहे. वादीने त्यांची जमिन वैयक्तिकरित्या मोजली असता ती ७/१२ उता-यामधील नमुद क्षेत्रापेक्षा कमी भरते.

०४. दि.३०/१२/२०१४ रोजी प्रतिवादीने वादीस दावा मिळकतीमध्ये येण्यास मज्जाव केला. प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन त्या ठिकाणी नव्याने वहिवाट करुन नविन हक्क प्रस्थापित करत आहेत. त्यामुळे जर प्रतिवादीचे वादीस असेच हरकत अडथळे सुरु राहिले तर वादीचे अपरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे वादीने दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेची विनंती केली आहे.

०५. सदर अर्जास प्रतिवादीने नि.१४ अन्वये त्याचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे त्याने त्याच्या मिळकतीमध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम केलेले आहे. सदर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वादी याने ग्रामपंचायतीकडे जागेची मोजणी करुन द्यावी म्हणून अर्ज केला. त्याप्रमाणे ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांनी जागेवर येवून त्यांनी वादीला प्रतिवादीने कुठलेही अतिक्रमण केले नसल्याचे समजावून सांगितले परंतु वादीने ऐकले नाही.

०६. प्रतिवादीने वादीचे क्षेत्रात अतिक्रमण केलेले नाही. प्रतिवादीचा उत्कर्ष हा वादीला सहन न झाल्याने प्रतिवादीच्या क्षेत्रात अतिक्रमण करण्यासाठी वादीने प्रस्तुतचा खोटा अर्ज दिलेला असल्याने तो नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

०७. प्रस्तुत अर्जास वादींतर्फे विद्वान विधिज्ञ श्रीमती एस.एस.रणनवरे व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.टी.बी.डोळसे यांचे म्हणणे ऐकले. तसेच दाव्यात दाखल करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघाले व त्यासाठीचे उत्तर मी कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे, हे वादी सिद्ध करतात काय ? | नाही. |
| २) | जर सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादी याचे अपरिमित नुकसान होईल काय? | नाही. |
| ३) | सदरच्या अर्जाची वादीच्या लाभात असलेली सोय, समतोल आहे काय? | नाही. |
| ४) | काय आदेश? | अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

०८. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे त्या तिनही मुद्दयांची कारणमिमांसा एकत्रीत करणे संयुक्तीक होईल. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ३ ची कारणमिमांसा एकत्रीत करत आहे.

**मुद्दा क्र.१ ते ३ साठी** :-

०९. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने, प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन वहिवाट करु नये व वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय ताब्यास हरकत अडथळे करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

१०. वादीनेच या अर्जाच्या पान क्र.१ वर असे नमुद केले आहे की, *‘प्रतिवादी याने वादीचे दावा मिळकतीमध्ये पश्चिमेकडून व उत्तरेकडून अतिक्रमण केलेले आहे. वादीने त्याची जमिन खाजगीत मोजली असता ती ७/१२ रेकॉर्डप्रमाणे भरत नाही.’* प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने गट क्र.७३७/४ मधील २ १/२ (अडीच) आर क्षेत्राबाबत तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे. पंरतु, वादीच्याच म्हणण्याप्रमाणे प्रतिवादींनी त्यांच्या क्षेत्रात अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी दावा मिळकत ही संपूर्णत: वादीच्या ताब्यात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे या ठिकाणी वादीच्या लाभात प्रथमदर्शनी केस नसल्याने जर तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर करण्यात आला तर वादीचे अपरिमित असे नुकसान होणार नाही. त्यामुळे वादी करुन मागत असलेली सोय, समतोल नसल्याने मी मुद्दा क्र.१ ते ३ उत्तर नकारार्थी देत असून, मुद्दा क्र.४ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## : आदेश :

१) वादीचा निशाणी क्र.५ चा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत अर्जाचा खर्च हा दाव्यासोबत आकारण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात उद्घोषित केले असे.)

**(प्र.ना.कुलकर्णी)**
२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

दिनांक: ०७/१२/२०१५